ISSN 2348-4276

बसव पथ

(मराठी द्वैमासिक)

* पृष्ठे ५२ * मूल्य ₹ १५/-

* वर्ष ९ * अंक ३
* नोव्हेंबर-डिसेंबर २०१८



...र्ती श्री चेन्नबसवेश्वर

PERIODICAL To,

डॉ. वेदप्रकाश डोणगावकर
शांताबाई गोटे महाविद्यालय
मु. पो. ता. जि. वाशिम-४४४५०५
महाराष्ट्र.
6/23

vinod

If Undel...

BASAVA PATH, C/o. Lulle Printers, Appa Chambers, Lokhand Galli,
At/Po. LATUR, Tq. & Dist. LATUR- 413512 Maharashtra State.

॥ श्री गुरू बसवलिंगाय नमः ॥

करुणेचा महासागरु ।समतेचा महामेरु ॥
दीनदलितांचा आधारु ।माऊली बसव ॥

बसव पथ

(म.बसवेश्वर आणि अन्य शरणांच्या जीवन व संदेश प्रसारार्थ समर्पित)

● वर्ष ९ ● अंक ३ ● नोव्हेंबर-डिसेंबर २०१८

● पृष्ठे ५२ ● मराठी द्वैमासिक ● मूल्य रु. १५/-

● Vol. - 9 ● Issue - 3 ● Nov. - Dec. 2018

RNI No. MAHMAR/2010/41737

ISSN 2348 - 4276

e-mail : basavapatha@gmail.com

संस्थापक अध्यक्ष :
लिं.डॉ.बी.डी.जत्ती

बसव समिती पदाधिकारी

अध्यक्ष :
श्री. अरविंद ब. जत्ती
ज्येष्ठ उपाध्यक्ष :
श्री. प्रभुदेव जे. चिगटेरी
उपाध्यक्ष :
डॉ. लीलादेवी आर. प्रसाद
श्री. हनुमंतरेड्डी मुद्नाळ
प्रधान कार्यवाह :
श्री. सी. आर. चिक्कमठ
श्री. एच. एस. देवाडिग
खजानिस :
श्री. डी. एम. श्रीधर
सहकार्यवाह :
श्री. ए. शिवमहादेवन्
श्री. एस. एस. नागराळे

बसव समिती
बसव भवन,
श्री बसवेश्वर सर्कल,
बेंगळूरु-560001
फोनः(080)22265505
e-mail:basavasamithi.india@gmail.com

संपादक : **बाळासाहेब म. पाटील**
उपसंपादक : **राजू ब. जुबरे**

अंतरंग

* षट्स्थल चक्रवर्ती श्री चेन्नबसवेश्वर ५
– संपादकीय
* अल्पसंख्याक धर्म : राष्ट्रीय एकता आणि कायदे ७
कन्नड : डॉ. एस. एम. जामदार, अनु. राजू ब. जुबरे
* स्वतंत्र धर्म आंदोलनामुळे बहुजन लिंगायत अस्मिता बळकट – चन्नवीर भद्रेश्वरमठ १२
* नीतिबोधक विनोदवीर नगेय मारितंदे १८
अश्विनिकांत
* अंधश्रद्धा निर्मूलन आणि बसव विचार २२
डॉ. वेदप्रकाश डोणगावकर
* श्री चेन्नबसवेश्वर वचनप्रभा ३५
* ख्यातनाम संशोधक डॉ. मोगलेवार ३८
डॉ. सूर्यकांत घुगरे
* ग्रंथ परीक्षण : बसवतत्त्वांचे सम्यक दर्शन : वचन सिद्धान्त सार – डॉ. रवींद्र वै. बेम्बरे ४१
* बसव वचन सौरभ – शिवानंद ४५

'बसव पथ' हे पत्र मुद्रक सोमनाथ मल्लिकार्जुन लुल्ले यांनी प्रकाशक अरविंद बसप्पा जत्ती,प्रेसिडेंट, बसव समिती ट्रस्ट व मालक बसव समिती ट्रस्ट यांच्यासाठी लुल्ले प्रिंटर्स, अप्पा चेंबर्स, लोखंड गल्ली, मु. पो. लातूर, ता. जि. लातूर-४१३५१२(महाराष्ट्र) येथे मुद्रित करून तेथेच प्रसिद्ध केले. संपादक – बाळासाहेब मलगौडा पाटील.

अंधश्रद्धा निर्मूलन आणि बसव विचार

डॉ. वेदप्रकाश डोणगावकर, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशिम. मो. ८९८३३८२९०९

आधुनिक युग हे विज्ञानयुग म्हणून ओळखले जाते. विज्ञान म्हटले की, प्रत्येक समस्येचे निराकरण होते असा आपला सामान्य समज आहे. हे बऱ्याच प्रमाणात सत्यही आहे. कारण, विज्ञान हे मानवजातीसाठी उपकारकच ठरले आहे. परंतु, विज्ञानाच्या प्रगतीनंतरसुद्धा आपल्या मानवी समाजामध्ये अशा काही समस्या अस्तित्वात आहेत की, ज्यावर विज्ञानालासुद्धा उपाययोजना करणे कठीण होत आहे. कारण, या सर्व समस्या एकीकडे मानवी प्रवृत्ती, मानवी स्वभाव, मानवी इच्छा, मानवी स्वार्थ इत्यादींना अनुसरून, तर दुसरीकडे मानवी अज्ञानातून उद्‌भवलेल्या आहेत. ज्यात प्रामुख्याने आपल्याला जातीयवाद, भ्रष्टाचार, दहशतवाद, बेरोजगारी, जीवनाविषयीची असुरक्षितता, स्त्रियांवरील अत्याचार आणि अंधश्रद्धा इत्यादी समस्यांचा उल्लेख करता येईल. यापैकी काही समस्या आधुनिक आहेत, तर काही प्राचीन आहेत. काही तर इतक्या प्राचीन आहेत की, परिणामी मानवासाठी त्या सवयीचा भाग बनल्या आहेत. अर्थात त्या समस्या म्हणूनही वाटत नाहीत. तेव्हा मानवी प्रवृत्ती व अज्ञानाला अनुसरून उद्‌भवलेल्या या सर्व समस्यांवर उपाययोजना करणे आजच्या घडीला काळाची गरज बनली आहे. त्यासाठी या सर्व विषयांकडे तात्त्विक, वैज्ञानिक आणि मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. भारतीय विचारांच्या परंपरेत ज्या महामानवांनी समाजातील अशा समस्यांकडे तात्त्विक, वैज्ञानिक आणि मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले,

त्यापैकी महात्मा बसवेश्वर हे एक होत. अर्थात या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी म्हणून महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचा परामर्श घेणे, आधार घेणे, किंबहुना त्यांच्या विचारांतून या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणे हासुद्धा एक पर्याय ठरेल.

अंधश्रद्धा ही प्राचीन काळापासून चालत आलेली समस्या आहे. किंबहुना मानवी अस्तित्वापासूनच ही समस्या उदयास आली असेही म्हणता येईल. विश्वातील मानवजातीचा एक मोठा भाग आज या अंधश्रद्धा नावाच्या विषयाने प्रभावित आहे. तर दुसरीकडे, विवेकाने वागणारे, वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारे काही मूठभर लोक मात्र या विषयाला समस्या मानून त्रस्त आहेत. अंधश्रद्धाळू लोक कसे असतात, त्यांचे आचार-विचार कसे असतात असाही काही लोकांना प्रश्न पडतो. त्या संदर्भात सांगायचे झाल्यास बेधुंद अवस्थेत वावरणारे, विवेक हरवून बसलेले, विशिष्ट विषयातच गुरफटून पडलेले, मानसिकदृष्ट्या हतबल झालेले असतात, ते अंधश्रद्धाळू लोक असे म्हणता येईल. याशिवाय प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देवाकडे किंवा दैवाकडे असते, असे मानणारी ही एक जमात आहे, तो एक धोका आहे याची कल्पनाही नसणारे लोक अंधश्रद्धाळू आहेत. हा खोटा समज, भ्रम, धोका कसा काय त्यांच्याठायी उत्पन्न झाला ? ही समस्या कशी बनली ? यासाठी नेमका काय आधार असेल, काय कारण असेल? या प्रश्नांसंदर्भात असे म्हणता येईल की, मानवी जीवनातील भीती आणि मोह यांच्याशी या समस्येचा अधिक जवळचा संबंध आहे. डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या दृष्टीने 'भीती आणि मोह' ह्या मानवाला हतबल करणाऱ्या दोन प्रबल प्रेरणा आहेत. अर्थात याच त्या दोन बाबी आहेत की, ज्यातून अंधश्रद्धेला आधार मिळतो, बळकटी मिळते.

अंधश्रद्धा ही श्रद्धेच्या विरोधी बाजू असते, असे म्हणण्याचे कारण नाही. विरोध हा विशिष्ट विषयाला अनुसरून दोन व्यक्ती व समूहांमध्ये असतो. 'ईश्वर' असण्यावर विश्वास असणे म्हणजे 'श्रद्धा' ठरत असेल, तर 'ईश्वर' असण्यावर विश्वास नसणे, किंवा तो नसण्यावर विश्वास असणे म्हणजे 'अंधश्रद्धा' ठरत नाही. याउलट, 'ईश्वर हा प्रेमाळू आहे, दयाळू आहे, तो सृष्टीच्या प्रत्येक कणात आहे, अर्थात तो चांगले आचरण करणाऱ्यात आणि वाईट वागणाऱ्यातसुद्धा आहे.' असे मानून चोराला आपल्या घरी राहण्याचे आमंत्रण देणे हा प्रकार एक वेळेस अंधश्रद्धा ठरू शकेल. अंधश्रद्धेच्या सर्वच विषयांची सुरुवात ही मानसिक अवस्थेतून होत असते. पुढे चालून ती सामाजिक,

धार्मिक यासारख्या क्षेत्रांत पसरत असते. एकंदर विविध क्षेत्रे व विषयांना अनुसरून अंधश्रद्धा नावाची ही समस्या मानवी जीवनात रुजलेली दिसून येते. तेव्हा या समस्येचे निर्मूलन करण्यासाठी म्हणून, बसवेश्वरांचे चिकित्सक व प्रासंगिक ठरणारे सामाजिक व धार्मिक विचार समाजापर्यंत पोहचवून, समाजाला विचारी बनविण्याचा, विवेकी बनविण्याचा प्रयत्न या ठिकाणी या साहित्याच्या माध्यमातून करता येईल.

सामाजिक अंधश्रद्धा

धर्म ही एक सामाजिक संस्था आहे. धर्ममुळे समाजाचे संघटन होत असते. धर्मामध्ये असलेल्या ईश्वर, भक्ती इत्यादी संकल्पना मानवाला आत्मिक समाधान देणाऱ्या असतात. परंतु, अंधश्रद्धेने वागणाऱ्या लोकांचे जेव्हा आपण निरीक्षण करतो किंवा त्या संदर्भात काही मते ऐकतो, तेव्हा हाच 'धर्म' अंधश्रद्धेचे कारण म्हणून आपल्या पाहण्यात व ऐकण्यात येते. यावरून अंधश्रद्धांचा आधार म्हणून आपण धर्माकडे पहाण्याचा प्रमाद घडवितो. मार्क्ससारख्या विचारवंताच्या 'धर्म ही अफूची गोळी आहे' यासारख्या विधानाने प्रभावित होऊन आपण धर्मसंस्कृती नेस्तनाबूत करण्यासाठी उतावळे होतो. पण हे असे का व्हावे ? खरंच 'धर्म' अंधश्रद्धांचे कारण ठरतो काय ? या प्रश्नाचा येथे विचार करावा लागेल. जगाच्या पाठीवर जेवढे धर्म मूळ रूपात कालपर्यंत होते व आज आहेत, त्या सर्व धर्मांचे तत्त्वज्ञान किंवा त्यांचा मूळ हेतू अंधश्रद्धांना 'प्रोत्साहित' करणे हा नसेलही ! परंतु, त्या ठिकाणी मूळ तत्त्वज्ञान बाजूला सारून निर्माण करण्यात आलेले नियम, कर्मकांड व धर्माचरणाला अनुसरून निर्माण झालेली भोगवादी प्रवृत्ती, होणारी हिंसा, वेळ व पैशाचा होणारा अपव्यय, मानवी जीवनात निर्माण झालेले नैराश्य आणि दैववादी प्रवृत्ती इत्यादी पाहता, हे धर्म अंधश्रद्धेसाठी निमित्त किंवा साधन ठरले आहेत असे मानण्यास हरकत नसावी. बसवेश्वरांच्या दृष्टिकोनातून धर्म हा हिंसा नव्हे, तर अहिंसा सांगणारा, भोग नाही, तर त्याग सांगणारा, पाप नाही, तर पुण्य सांगणारा, दंड नाही, तर दया सांगणारा असला पाहिजे आणि याच बाबींचा प्रत्यय आपल्याला पुढील वचनातून येतो.

दयाविहीन धर्म तो काय करू शकेल ?
दया हवीच सर्व प्राणिमात्रांवर.
कारण, दया धर्माचे मूळ हो.
कूडलसंगय्या तसे नसल्यास नाकारी. (वचन-२२३ पृ. ५७)

निश्चितपणे बसवेश्वरांचा हा विचार विश्वातील सर्वच धर्मांच्या अस्तित्वाचा आशय स्पष्ट करतो. इतकेच नव्हे तर, त्या सर्व धर्मांना आपल्या उद्दिष्टाप्रती बांधील राहण्याचे आवाहन देखील करतो. अर्थात 'दया' हाच प्रत्येक धर्माचा आशय असावा आणि 'दया' हेच प्रत्येक धर्मानुयायीचे, व्यक्तीचे उद्दिष्ट असले पाहिजे हे या वचनातून स्पष्ट होते.

परंतु विविध दृष्टिकोनांतून जेव्हा आपण अस्तित्वात असलेल्या सर्व धर्मांचा तुलनात्मक विचार करतो, तेव्हा मात्र काही धर्म कठोर, तर काही धर्म सौम्य स्वरूपाचे असल्याचे मतही समोर येते. कदाचित धर्मा-धर्मातील आचरणपद्धतींमुळे, कर्मकांडांमुळे काही धर्म कठोर, तर काही धर्म सौम्य स्वरूपाचे वाटत असावेत. सामान्यतः आज आपण पहात आहोत की, प्रत्येक धर्मानुयायी आपल्या धर्ममताच्या प्रचाराकरिता प्रयत्न करीत असतो. तो आपल्या मत वा विचारांना पोषक असे वातावरण मिळेल अशी अपेक्षा ठेवून असतो. पण जिथे कोठे काही धर्मानुयायींना पोषक वातावरण मिळत नाही, तेव्हा त्या वातावरणाविषयी, त्या वातावरणात वावरणाऱ्या विशिष्ट लोकांविषयी, इतकेच नव्हे तर, त्या ठिकाणच्या सामान्य लोकांविषयीसुद्धा त्या धर्मानुयायांच्या मनात तिरस्काराची भावना निर्माण होते आणि अशा प्रकारची भावनाच आपल्या मताचा 'आग्रही' पुरस्कार करण्यासाठी अर्थात 'द्वेष व हिंसेसाठी' प्रमुख कारण बनते. अशा प्रकारची ही अवस्था म्हणजे अंधश्रद्धाच असते. म्हणून या ठिकाणी लक्षात घेण्यासारखी बाब आहे की, 'धर्ममताचा पुरस्कार आणि स्वीकार हा आग्रहाचा विषय नसतो, तर तो 'निष्ठेतून अभिव्यक्तीचा आणि स्वेच्छेतून स्वीकारण्याचा' विषय असतो आणि या अशा अवस्थेवर, व्यवस्थेवर विश्वास ठेवणे म्हणजे श्रद्धा होय. या दोन्ही अवस्थांना अनुसरून बसवेश्वरांचे पुढील वचन महत्त्वाचे वाटते.

मनात निष्ठा नसता केले जे जे,
ते व्यर्थ गेले सारे.
मनात शुद्ध भाव नसता दिले जे जे,
तेही व्यर्थ गेले सारे.
केले, दिले शुद्ध भावाने ज्याने,
आपलेसे करील तया कूडलसंगमदेव. (वचन, ३२४, पृ. ८३)

निश्चितपणे बसवेश्वरांचे हे वचन आजच्या सर्व धर्मानुयायांना आपल्या मनात 'निष्ठा आणि शुद्ध भाव' ठेवण्यासाठी प्रेरणादायी ठरणारे आहे. आजच्या परिस्थितीत धर्माचरण एक थोतांड बनले आहे. परमेश्वराच्या शुद्ध स्वरूपाला कर्मकांडाच्या विळख्यात गोवून ठेवले गेले आहे. धर्माला कर्तव्यरूपात महत्त्व देण्याऐवजी अलौकिक रूपाने पाहिले जात आहे. पावित्र्याच्या नावाखाली भेद केला जात आहे. धर्म-अधर्माच्या नावाने हिंसेला हिंसेनेच उत्तर मिळत आहे. अशा परिस्थितीत बसवेश्वरांनी सुचविलेला 'शुद्ध भाव' हा एकमेव पर्याय उपयुक्त ठरणारा आहे. अशा या शुद्ध भावाच्या परिणामीच अद्वैताची जागृती होऊ शकते. समतेचे राज्य प्रस्थापित होऊ शकते. कारण मनुष्याच्या ठायी जेव्हा शुद्ध भाव वसतो, तेव्हा त्याला संपूर्ण विश्व एक कुटुंब वाटू लागते. त्याला जात, धर्म, वर्ग, लिंग यासारख्या गोष्टी निरर्थक वाटू लागतात. तो सर्व धर्मांचा मूळ अर्थ समजू लागतो. तो त्या सर्व धर्मांना संप्रदायनिरपेक्ष परेश्वराची अंगे मानू लागतो. बसवेश्वरांनी उद्गारलेल्या, 'देव एक, तया नामे अनेक...' याविषयीची अनुभूती यायला लागते. परिणामी, समाजात मानवजातीमध्ये द्वेष, वैमनस्य, धार्मिक हिंसाचार पहावयास मिळणार नाही. एकंदरीत 'शुद्ध भाव' हे तत्त्व अंधश्रद्धा संपविण्यासाठी उपयुक्त ठरणारे आहे.

तथाकथित गुण आणि कर्मांच्या आधारे वर्णव्यवस्था निर्माण झाली. त्या वर्णव्यवस्थेतून जातिव्यवस्था उत्पन्न झाली. जातींच्या नावाने नसलेल्या गुणांना व्यक्ती व व्यक्तिसमूहावर लादले गेले. आवड-निवड; कौशल्य बाजूला ठेवून कर्मविभाजन होऊ लागले. गुण लादण्याची आणि त्यातून थोपविलेले कर्म पिढ्यान्‌पिढ्या करीत राहण्याची परंपरा निर्माण केली गेली. त्यातून आपले आणि परकेपणाची मानसिकता रूढ झाली. अशा प्रकारचा हा रूढीवाद किंवा मानसिकता ही त्या समाजाच्या संकुचितपणाचे लक्षण असते. ती एक प्रकारची अंधश्रद्धाच असते. पण बसवेश्वर अशा या मानसिकतेचा, संकुचितपणाचा आपल्या वचनातून समाचार घेतात.

लोखंड तापुनी झाला लोहार,
धुणी धुऊनी झाला परीट,
वस्त्र विणुनी झाला विणकर,
वेद वाचुनी झाला ब्राह्मण,
या जगी कानातून जन्मला का कोणी ?

कूडलसंगमदेवा, या योगाने लिंगस्थल
जो जाणे, तोचि कुलवान. (विश्वविभूती बसवण्णा, पृ. ६३)

बसवेश्वरांनी वर्णव्यवस्थेतून निर्माण झालेल्या जातिव्यवस्थेच्या रूढीवादाला किंवा त्या प्रकारच्या मानसिकतेला छेद देण्याच्या भावनेतूनच इष्टलिंग धारण करण्याचे स्वातंत्र्य, सर्व जातीतील स्त्री-पुरुषांना अनुभव मंटपाच्या माध्यमातून स्वतःच्या इच्छेनुसार कर्मनिवडीचे स्वातंत्र्य, विचार अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य बहाल केले होते. याशिवाय आंतरजातीय विवाहपद्धतीचा पुरस्कार करून, जातिव्यवस्था मोडीत काढली होती. परंतु, आजही स्वतःला बसव अनुयायी म्हणवून घेणारे काही अभ्यासक वा विचारकसुद्धा आपल्यातली संकुचित मानसिकता, अंधश्रद्धा संपवू शकले नाहीत. कारण, त्यांच्यात असलेला परकेपणाचा भाव अजुनही जिवंत आहे. तो भाव अभावात परिवर्तित करण्यासाठी बसवेश्वरांचे पुढील वचन उपयोगी ठरेल.

'हा कोणाचा ? हा कोणाचा ? हा कोणाचा म्हणवू नका हो.
हा आमचा, हा आमचा, हा आमचा म्हणवा हो.
कूडलसंगमदेवा, तुमचा घरचा पुत्र म्हणवा हो.'' (वचन, ६४, पृ. १७)

जोपर्यंत माणसाची मानसिकता व्यापक बनणार नाही, आपला आणि परका भेद मिटणार नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थाने समाजात पसरलेली ही सामाजिक अंधश्रद्धा संपविता येणार नाही. कोणतीही अंधश्रद्धा म्हणजे अविवेकीपणा आहे. तो अज्ञानाचा परिणाम आहे. मानवाच्या ठिकाणी विवेक आणि ज्ञान उत्पन्न करायचे असेल तर, आपलेपणातूनच ते शक्य आहे. आपलेपणा हा मानसिक बळ देणारा असतो. तो माणसाला विकासासाठी प्रेरित करणारा असतो. परंतु आजही आपण पहात आहोत की, जाती आणि धर्माच्या नावाखाली माणसे दुभंगली आहेत. माणसापरत्वे जमिनी विभागल्या आहेत. अर्थात आपलेपणाऐवजी परकेपणाच आज अधिक प्रमाणात पहावयास मिळत आहे. पण हा परकेपणाचा भाव निरर्थक असतो, हे मानून बसवेश्वरांनी आपल्या वचनातून काही प्रश्न उपस्थित करून, माणसाचा विवेक जागृत करण्याचा व त्यातूनच आपलेपणाचा भाव निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

महारवाड्याची वा शिवालयाची
जमीन असे का वेगळी ?
शौचाचे पाणी वा आचमनाचे पाणी

असे का शुचि-अशुची ?
ज्ञानियांची जात असे एक,
षड्दर्शन मुक्तीस फळ लाभे समान.
कूडलसंगमदेवा, तुज जे जाणती,
तयांची पातळी असे असामान्य. (बसव वचनामृत, मराठी, पृ.२९)

बसवेश्वरांनी उपस्थित केलेले हे प्रश्न आजचे सामाजिक प्रश्न सोडविण्याची प्रेरणा देतात. राम मंदिर आणि बाबरी मशिदीच्या जमिनीचा संघर्ष हा परकेपणातून उत्पन्न झालेला विषय आहे. तेव्हा ''कोणती जमीन हिंदूंची नी कोणती मुस्लिमांची ? ही जमीन तर आहे ईश्वराची !'' असा संदेश बसवेश्वरांच्या विचारांनी प्रभावित होऊन देता येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाण्यासाठी वा मंदिर प्रवेशासाठी केलेले आंदोलन हेसुद्धा परकेपणा निर्माण करू पाहणाऱ्या मनोवृत्तीच्या विरोधात केलेले आंदोलन होते.

आज समाजातला परकेपणा संपविण्यासाठी आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह हा एक उत्तम पर्याय आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनातून अशा प्रकारे होणारा संकर योग्यच ठरतो. कारण त्यातून निर्माण होणारे बीज हे अधिक सदृढ असते. याविषयी म्हणावी तशी जागृती झालेली दिसत नाही. लिंगायत समाजातील अनेक लोक, अगदी बसवेश्वरांना मानणारेसुद्धा अशा प्रकारच्या विवाहाची थट्टा उडविताना दिसतात. अशा प्रकारची विसंगती म्हणजे सामाजिक अंधश्रद्धाच होय. बसवेश्वर अशा लोकांना भक्तही मानत नाहीत आणि युक्तही मानत नाहीत. हेच त्यांच्या एका वचनातून दिसून येते.

खाण्या-पिण्याने म्हणती झाला क्रियाहीन.
कन्या देण्या-घेण्यात हुडकती जात-पात.
कसा म्हणू तयांना भक्त ? कसा म्हणू तयांना युक्त?
(बसव वचनामृत मराठी, पृ. ३१)

बसवेश्वरांनी इथे खऱ्या भक्ताची आणि युक्त व्यक्तीची व्याख्या केलेली दिसते. त्यांच्या मते, खरा भक्त हा जात-पातविरहित जीवन जगणारा असतो आणि जो जाती-पातींच्या पलीकडे जाऊन मानवाला माणुसकीच्या भावनेतून पहातो, तोच खरा युक्त असतो. आज समाजात काही जातींमध्ये आंतरजातीय विवाह मान्य केला जात आहे. मात्र तेथेसुद्धा विशिष्ट जातींशीच नातेसंबंध जोपासण्यावर भर दिला जात आहे. कोणत्याही

वधू किंवा वराचे व्यक्तिमत्त्व जातीवर अवलंबून नसते. ते त्याच्यावर झालेल्या संस्कारांवर आणि त्याच्यात असलेल्या गुणांवर अवलंबून असते. मात्र समाजाचा दृष्टिकोन एकांगीच असल्याचे दिसून येते. अशा लोकांना उद्देशून बसवेश्वर आपल्या एका वचनातून काही पौराणिक उदाहरणांचा दाखला देतात. ते वचन पुढीलप्रमाणे आहे.

भोईणीचा सुत, नाव त्याचे व्यास,
मार्कंडेय खास, मांगिणीचा.
मंडुकाची कन्या, थोर मंदोदरी,
जातीची ती थोरी, काय कीजे.
बेरडाचे पोटी, अगस्तीचा जन्म,
चांभार उत्तम, तो दुर्वास.
कश्यप लोहार, कौंडीण्य तो न्हावी,
तिन्ही लोकी बरवी, प्रसिद्धी ती.
जातीचे श्रेष्ठत्व हाचि वेडाचार.
(बाराव्या शतकातील आद्य समाजसुधारक : महात्मा बसवेश्वर, पृ. ८६)

व्यक्तिमत्त्व आणि श्रेष्ठत्व हे जातीवर नव्हे, तर संस्कारांवरून आणि कर्तृत्वावरून सिद्ध होते हेच या वचनातून ध्वनित होते.

धार्मिक अंधश्रद्धा

धर्म ही एक सामाजिक संस्था आहे. पण धर्माच्या अनुषंगाने येणाऱ्या ईश्वर, भक्ती, उपासना, पाप-पुण्य, पुनर्जन्म, नवस, उपवास, तप, ज्योतिष, वार-वेळ-नक्षत्र इत्यादी विषयांना अनुसरून अंधश्रद्धा पसरत असल्याचे पहावयास मिळते. हे सर्व विषय कदाचित विशिष्ट काळात, विशिष्ट दृष्टिकोनातून उपयुक्त किंवा प्रासंगिक ठरले असावेत. परंतु आजचे हे युग विज्ञानयुग आहे. आज निरीक्षणाच्या कसोटीवर खऱ्या उतरणाऱ्या विषयांचेच सत्यत्व टिकून आहे. बसवेश्वर वर्तमानवादाचा पुरस्कार करताना दिसतात. पूर्वीपासूनच पूर्वजन्माची आणि पुनर्जन्मची संकल्पना समाजामध्ये रूढ आहे. या संकल्पनेचा दुरुपयोग आणि दुष्परिणाम कसा व काय झाला ? हे पहाणे औचित्याचे आहे. हे दोन्ही विषय कर्मसिद्धांतावर आधारलेले आहेत. 'पूर्वजन्मातील कर्माचे फळ भोगण्यासाठी हा वर्तमान जन्म आणि या वर्तमान जन्मातील शेष कर्माचे फळ मिळविण्यासाठी वा भोगण्यासाठी पुनर्जन्म' असा हा कर्मसिद्धांताचा प्रकार आहे.

अशा या प्रकारामुळेच जीवनात निष्क्रियता आणि उदासीनता पसरते. म्हणून बसवेश्वर वर्तमानवादाद्वारे जीवनाला कर्तव्यक्षम बनविण्यासाठी प्रयत्न करताना दिसतात.

भारतीय समाजामध्ये मोक्ष संकल्पनेला अनुसरून काही क्रिया-कर्म सुचविले गेले आहेत. पिंडदान, पितृभोजन, तीर्थयात्रा, गंगास्नान असे काही प्रकार पितरांच्या मोक्षासाठी केले जातात. या सर्व प्रकारांमध्ये यजमान व्यक्तीच्या वेळ आणि पैशाचा अपव्यय होत असतो. म्हणून बसवेश्वर अशा क्रिया-कर्मांना हास्यास्पद ठरवितात. हे त्यांच्या पुढील वचनातून दिसून येते.

बोटे मोजून परमार्थ शक्य होणे, आश्चर्यकारक नव्हे का ?
नाक दाबून मुक्तीची अपेक्षा करणे, हास्यास्पद नव्हे का ?

(म. बसवेश्वर - डॉ. आंबेडकर, पृ. ६०)

भारतीय समाज भावनाप्रधान आहे. मात्र ही भावुकता बऱ्याच प्रमाणात अज्ञानावर आधारलेली दिसून येते. अशा या भावुकतेतून निर्माण झालेल्या अंधविश्वासातूनच विहीर, नदी, तळे, वृक्ष आदींची पूजा करण्याचे प्रकार, या पूजाविधीतून पान, फुले, हळद-कुंकू-अक्षता त्या जलाशयात सोडण्याचे प्रकार, याशिवाय या विधीसाठी वृक्षांच्या फांद्यांची होत असलेली नासधूस आपण पहात असतो. बसवेश्वरांच्या दृष्टिकोनातून हे लोक परमेश्वराचे वास्तव रूप जाणू शकत नाहीत.

नदी पाहिली की डुबकी मारतात.
झाड पाहिले की प्रदक्षिणा घालतात.
आटणारे पाणी आणि वठणाऱ्या झाडावर विश्वास ठेवणारे
तुम्हांस कसे जाणणार, कूडलसंगमदेवा. (वचन, २५७, पृ. ६६)

बसवेश्वरांनी मांडलेला बाराव्या शतकातला हा विचार आजच्या घडीला अनेक संदर्भातून प्रासंगिक ठरतो. आज मानवांसह इतर जीवांसाठी पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यात अस्तित्वात असलेल्या जलसाठ्यांचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. जलसाठ्यांच्या प्रदूषणासाठी औद्योगिकरण हे तर प्रमुख कारण आहेच. त्याचबरोबर धार्मिक विधींमुळे होणारे प्रदूषण हेसुद्धा एक कारण ठरत आहे. आज पर्यावरण संतुलित ठेवण्याच्या अनुषंगाने वृक्षलागवड गरजेची बनली आहे. परंतु मोजक्याच स्वरूपात उपलब्ध असलेल्या वड, पिंपळ यासारख्या ऑक्सिजन पुरवणाऱ्या वृक्षांभोवती ओटे बांधून, त्यावर हळद-कुंकू-दोरे चढवून समाज आपल्याला मिळणाऱ्या

नैसर्गिक साधनसंपत्तीचा अपव्यय करीत आहे. किंबहुना आपले स्वतःचे आरोग्य धोक्यात घालत आहे.

बसवेश्वरांना हे लक्षात आले असावे की, मनुष्य भीतीपोटी, स्वार्थापोटी धर्म व धार्मिक विधींच्या आहारी गेला आहे. इतकेच नव्हे तर, धर्म सांगणाऱ्या लोकांच्या हातची कठपुतळी बनला आहे. कारण राशी, गण, वार, तिथी वेळेवरून विवाह मोडले आणि जुळवले जायचे, कामाचे नियोजन केले जायचे. अर्थात गुण आणि कर्मापेक्षा भलत्याच विषयांना महत्त्व दिले जायचे. अशा विवंचनेत पडलेल्या लोकांना बसवेश्वर पुढील वचनाच्या माध्यमातून आवाहन करतात की,-

पुसता स्वजन, सांगा हीच शुभघटी शुभलग्न.
सांगा हो, जमल्या राशी, ऋणसंबंधही जुळले,
अन् सांगा हो, चंद्रबल-ताराबलही लाभले.
सांगा हो, उद्यापेक्षा आजचाच दिन मंगल,
हे असे हो तुमचे, कूडलसंगमदेव पूजनाचे फल.

बसवेश्वरांचा हा विचार भविष्याचा वेध घेणारा होता. कारण आज आपण काही प्रमाणात का असेना, परंतु हे पहात आहोत की, प्रेमविवाह, आंतरजातीय विवाह, नोंदणी विवाह इत्यादींमध्ये केवळ आपलेपणा पाहिला जात आहे. त्या ठिकाणी राशी, गण, ग्रहबल, वार, वेळ यांना फारसे महत्त्व दिले जात नाही. बसवेश्वरांचा हा विचार समाजातील दैनंदिन व्यवहारात रुजविणे ही काळाची गरज बनली आहे.

वास्तविक धर्म हा उपासना सांगणारा असतो. पण धर्म सांगणाऱ्या लोकांनी उपासनेऐवजी उपवासाला जनमानसात, विशेषतः महिला वर्गात रुजविले. परिणामी, महिला शारीरिकदृष्ट्या पुरुषांच्या तुलनेत अशक्त राहिली. तिच्यात एक प्रकारे मानसिक दौर्बल्य निर्माण झाले. शेकडो वर्षांपासून चालत आलेली ही उपवास करण्याची परंपरा आजही आपल्या समाजात मोठ्या प्रमाणात पहावयास मिळते. पण ही परंपरा भक्तीची नव्हे, तर स्वतःला, स्वतःच्या शरीराला, इतकेच नव्हे तर, आपल्यात वसलेल्या परमेश्वरालाच त्रास देण्याची होय असे बसवेश्वरांच्या या वचनातून म्हणता येईल.

देहासी शिणवुनी, मनासी कळवळुनी
साधावे म्हणती तव चरण, हे उचित का ?
असली करणी दाहिल्याविना राहील का ?

कूडलसंगमदेवा, शिवभक्ताच्या यातना,
त्या लिंगदेवाच्या यातना ! (बसव वचनामृत, मराठी, पृ. १९)

आजही समाजामध्ये ज्योतिषी, भविष्य सांगणारे भरपूर आहेत. कोणी कपाळ-हात-पाय पाहून भविष्य सांगतो, तर कोणी नाव-गाव-जन्मवेळ पाहून सांगतो. या भविष्य सांगणाऱ्या लोकांचे साधन म्हणजे त्यांच्याजवळ असलेले पंचांग, पोपट, बैल असते. वास्तविक, 'मानवी जीवनात मृत्यू हेच एकमेव नित्य व निरपेक्ष भविष्य आहे. इतर सर्व अनित्य व सापेक्ष आहे.' परंतु असे असतानाही काही लोक पंचांगातील किंवा पोपटाने काढलेल्या चिठ्ठीतील मजकुरावर विश्वास ठेवतात. जर त्या मजकुरात 'तुला तुझ्या नातलगांकडून धोका आहे' असे सांगितले असेल तर, ती संबंधित व्यक्ती कोणतेही कारण नसताना आपल्या नातलगांचा द्वेष करू शकते किंवा त्यांच्यापासून लांब राहण्याचा प्रयत्न करते. एकंदरीत, भविष्य सांगणाऱ्याचे ऐकून आपल्या भविष्याचे नियोजन करण्याच्या नादात आपले वास्तवात असलेले वर्तमान जीवन मात्र बिघडवून बसते. अशा या विसंगतीतून, अज्ञानातून मानवाला बाहेर काढण्याच्या उद्देशाने बसवेश्वरांनी पुढील तर्क मांडला.

पोपटाच्या भविष्याने काय मिळविले,
झडप ना कळाले, मांजराचे.
सांगतो पोपट, भविष्य जगाचे
मरण स्वतःचे नाही ज्ञात.
जगा पाही डोळे, परी न दिसे काटे
धसकटे, तुराटे इजा देई.
परगुण पारखी, मिरवीत फिरतो,
परि ना पाहतो, आपुलेचि. कूडलसंगमदेवा,
चाले ऐसे कैसे, तुम्हां दिसतसे, सर्व काही.

(वचनामृत बसवेश्वरी, पृ. १६५)

जो आपल्या स्वतःविषयी काही निश्चित असे भविष्य वर्तवू शकत नाही, तो इतरांचे काय भविष्य सांगणार ? जो आपल्यातले अवगुण जाणत नाही, तो इतरांचे दुर्गुण काय सांगणार ? जो आपल्यात ज्ञानाची ज्योत पेटवू शकत नाही, तो इतरांना काय अज्ञानी ठरवणार ? असे काही प्रश्न येथे उपस्थित होतात. पाश्चात्त्य विचारवंत

हॉब्जच्या दृष्टिकोनातून, मनुष्य हा स्वार्थी असतो. सुख मिळविणे, दुःखापासून वाचणे, दुःखातून बाहेर पडणे यासाठी तो प्रयत्नरत असतो. पण अशा प्रकारचा स्वार्थ जोपासणे सर्वांनाच शक्य नाही. कारण सर्वच स्वार्थी आपल्या स्वार्थातून सुख प्राप्त करतात असे नाही. भारतीय परंपरेत 'आपल्या सोयीनुसार' धर्म सांगणारे काही स्वार्थी लोक आहेत. त्यांच्याही वाट्याला दुःख आहे आणि ते या दुःखाच्या प्रसंगांतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करतात. या प्रयत्नांतून त्यांची विसंगती मात्र जगासमोर येते. हे बसवेश्वरांच्या या वचनातून पहावयास मिळते.

विस्तवासी देव मानुनी हवी वाहणाऱ्या
ब्राह्मणाचे घर आग लागुनी जळता,
मोरीचे पाणी अन् धूळ टाकुनी
हाक मारिती आरडाओरड करूनी.
कूडलसंगमदेवा, वंदन करणे विसरुनी
करिती निंदा अग्नीची सारे ! (बसवेश्वरांचा देव, पृ. ३४)

अशा प्रकारच्या वाक्यांतून कोणाचा तरी स्वार्थ आणि कोणाचे तरी अज्ञान पहावयास मिळते. म्हणून अज्ञान मिटविण्यासाठी, आपल्यातला विवेक जागृत करण्यासाठी ज्ञानाची कास धरणे आवश्यक आहे. म्हणून बसवेश्वर म्हणतात –

ज्ञानाच्या प्रभावाने अज्ञानाचा नाश पहा हो.
ज्योतीच्या प्रभावाने अंधकाराचा नाश पहा हो.
सत्याच्या प्रभावाने असत्याचा नाश पहा हो.
परिसाच्या प्रभावाने लोहत्वाचा नाश पहा हो.
कूडलसंगाच्या शरणांच्या अनुभावाने मम भवनाश पहा हो.

(वचनकार आणि व्यक्तिमत्त्व विकास, पृ. २३)

जीवनात विकासाकरिता ज्ञान ही अत्यंत गरजेची बाब आहे. पण ज्ञानाचे स्रोत काय असले पाहिजेत ? बुद्धी की अनुभव ? याविषयी साधारणपणे १४व्या शतकात पाश्चात्त्य देशात बराच वाद झाला आणि त्यातून बुद्धिवाद आणि अनुभववाद अशा दोन सिद्धांतांची मांडणी झाली. पण त्याअगोदर आपल्याकडे बाराव्या शतकातच महात्मा बसवेश्वरांनी अनुभव आणि अनुभाववादाचा पुरस्कार केल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे, बसवेश्वर केवळ स्वानुभवाला महत्त्व देत होते असे नाही; तर ते सामान्यपणे वावरणाऱ्या

सहकारी शरणांच्या अनुभवालाही महत्त्व देत होते. त्यांच्या या अशा प्रकारच्या अनुभववादाची झलक आपल्याला आधुनिक पाश्चात्त्य विचारवंत जे. ई. मूर यांच्या विचारांतूनसुद्धा येऊ शकते. कारण, मूरसुद्धा भाषेच्या माध्यमातून तत्त्वांच्या सत्य-असत्यतेसंदर्भात सामान्य बुद्धीला महत्त्व द्यायचा. एकंदरीत, सामाजिक अंधश्रद्धा असो वा धार्मिक अंधश्रद्धा, ती अज्ञानातून, अंधकारातून, असत्यातून उत्पन्न होते. मात्र तिचा नाश अनुभवरूपी ज्ञानानेच होतो, हे या ठिकाणी स्पष्ट होते.

स्वामी-सेवक संबंधाचा पथ कोणता म्हणाल तर,
सत्यचि बोलावे अन् बोलापरी चालावे.
वचनभ्रष्ट, आचरणभ्रष्ट प्रापंचिकासी
नच पावे कूडलसंगमदेव.

(ब. व. सं.१, व. क्र. २३७)

तात्पर्य - व्यावहारिक जगात चतुर मालक आपल्या सेवकाचे प्रामाणिक बोलणे अन् वागणे, सोपविलेल्या कामावरील त्याची निष्ठा इ. गुण जोखूनच त्याच्या सेवेची कदर करतो, त्याची पाठ थोपटतो. धनलोभाने भ्रष्टाचारी बनलेला सेवक मात्र मालकाच्या नजरेतून उतरतो. पारमार्थिक जगतात शिव हा जीवाचा स्वामी अर्थात मालक आणि जीव हा शिवाचा सेवक होय. ऐहिक व पारमार्थिक जीवनातील आपल्या सेवकाचे नित्य सत्यभाषण आणि त्यास अनुरूप तत्पर सत्यवर्तन दिसून आल्यास, त्याच्या निष्ठायुक्त भक्तिगुणसंपदेवर भाळून स्वामी शिव आपला सेवक असलेल्या जीवावर प्रसन्न होतो. शिव आणि जीवातील स्वामी-सेवक भक्तिसंबंधाचा हा पथ न जाणता, शिवसेवारत न होता, विषयमोहाच्या जाळ्यात फसतो, तो प्रापंचिक जीव होय. विषयसुखांच्या हव्यासाने खोटे बोलून, भ्रष्ट आचरण करून स्वामिद्रोह करणाऱ्या वाचाळ, दांभिक, अविवेकी, प्रपंचमोही सेवकाला शिवाची शाबासकी मिळत नाही, शिवकृपेचा लाभ होत नाही असे सांगून बसवण्णांनी ह्या वचनाद्वारे सत्य वाणी आणि वाणीनुसार सत्यवर्तन हाच शिवभक्तीचा राजपथ असल्याचे प्रतिपादिले आहे.

- शिवानंद